उप आयुक्त (विशेष) तथा
मुख्य स्मार्ट सिटी समन्वयक
पुणे महानगरपालिका
जा.क्र. उआवि/५६५
दिनांक:- ०८/१२/२०१५.

मा. नगरसचिव
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर...

**विषय:- सुधारीत केलेले डॉकेट मा.मुख्य सभेच्या मान्यतेस ठेवणे बाबत.**

**संदर्भ:-**१. मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयाकडील जा.क्र.मआ/उआ(वि)/६७४ दिनांक २/१२/२०१५ रोजीचे डॉकेट.

२. दिनांक ९/१२/२०१५ रोजी आयोजित केलेली मुख्य सभेची विशेष सभा.

उपरोक्त संदर्भ क्र. १ मध्ये नमुद केलेले डॉकेट मा.स्थायी सभेत दिनांक २/१२/२०१५ रोजी मान्यतेस सादर करणेत आले होते. सदर डॉकेट हे स्मार्ट सिटी अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या पुणे शहराचा स्मार्ट सिटी अहवाल राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्या विषयी मान्यता घेणेसाठी सादर करण्यात आले होते. या बाबीस मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.

उल्लेखित स्मार्ट सिटी अभियान हे केंद्र शासनाच्या मिशनविवरण आणि मार्गदर्शक तत्वांमधील मुद्दा क्र. १० मध्ये विहित केल्याप्रमाणे प्रत्येक शहरासाठी एक विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही) स्थापित करून पार पाडावयाचे आहे. या अनुषंगाने पुणे शहरासाठी स्थापन करावयाच्या विशेष उद्देश वाहनाची (एस.पी.व्ही) रचना व तत्वे ही मा.महापालिका आयुक्त, प्रकल्पासाठी नियुक्त तज्ञ सल्लागार व प्रशासन यांच्या संयुक्त चर्चेतुन निश्चित करण्यात आलेली आहेत.

सदर अंतिम केलेल्या तत्वांचा उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये उल्लेख केलेल्या डॉकेट मध्ये समावेश करून संबंधित डॉकेट सुधारित करण्यात आलेले आहे. तरी संबंधित डॉकेट मा. मुख्य सभेपुढे खालील विषयांबाबत मान्यता घेण्यासाठी ठेवणेस विनंती आहे.

१. स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पुणे शहराचा "स्मार्ट सिटी प्रस्ताव/अहवाल" मा. राज्यशासनामार्फत मा.केंद्रशासनाकडे पाठविण्यास

२. स्मार्ट सिटी अभियानाच्या विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही) च्या निर्मितीस, रचनेस व तत्वास मान्यता मिळणेस

मा.स.कळावे.

कुणाल कुमार
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

सोबत,

(१) एस.पी.व्ही ची रचना व तत्वे (प्रत्येकी १४ पाने इंग्रजी तथा मराठी)

o/c

Scanned by CamScanner